# आदिवासी अधिकार राष्ट्रीय मंच

## महाराष्ट्र राज्य परिषद

तलासरी जिल्हा ठाणे

दिनांक 21 व 22 डिसेंबर 2013

महाराष्ट्रातील आदिवासींच्या जिव्हाळ्याच्या समस्यांवर आपण करत असलेल्या संघटित संघर्षाचा विस्तार व्हावा आणि अधिक बळकटी यावी यासाठी आपण आज ही आदिवासींची राज्य परिषद आयोजित केली आहे. जून 2010 मध्ये आदिवासी अधिकार राष्ट्रीय मंचचे राष्ट्रीय पातळीवरील सम्मेलन झाले. त्यानंतर महाराष्ट्रात राज्यस्तरीय मेळावा घ्यावयाचे आपण ठरविले होते. परंतु या ना त्या कारणामुळे आपल्याला तो पुढे ढकलावा लागला. मध्यंतरीच्या काळात आपण वनाधिकार कायद्याच्या अंमलबजावणीसाठी सातत्याने लढे उभारले. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायद्यानुसार कामाची आणि वेतनाची मागणी करून आंदोलने केली. आदिवासींसाठी असलेल्या केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ खऱ्याखुऱ्या गरजूंना व्हावा म्हणून मोर्चे काढले. दुष्काळ आणि अतिवृष्टी यामुळे वाताहत झालेल्या गावातील आदिवासींना आणि इतर श्रमिकांना नुकसान भरपाई मिळावी आणि त्यांचे पुनर्वसन व्हावे याकरिता प्रयत्न केले. आश्रमशाळा आणि वसतीगृहातील अनागोंदी व भ्रष्टाचाराला वाचा फोडली. शासकीय सेवेतील/ नोकऱ्यांमधील बॅकलाग भरून काढावा म्हणून तगादा लावला. स्थलांतरीत आदिवासी मजुरांच्या वेठबिगारीला पायबंद बसावा आणि त्यांची फसवणूक करणाऱ्यांविरुद्ध कारवाई व्हावी म्हणून पाठपुरावा केला. वनाधिकारी, पोलीस, नोकरशहा आणि मालदार-ठेकेदारांच्या दडपशाहीविरुद्ध तडाखेबंद मोहीम केली. आदिवासी स्त्रियांचे विशेष प्रश्न घेऊन ते सोडविण्यासाठी लक्ष दिले. आदिवासींचे शिक्षण आणि आरोग्य या गोष्टींवर सर्वे करून त्यांच्या खास मागण्यांवर निदर्शने केली.

केंद्र आणि राज्य सरकारच्या नवउदारवादी जनविरोधी आर्थिक धोरणांचे अतिगंभीर परिणाम श्रमिकवर्गांवर आणि विशेषेकरून सगळ्यात शोषित-पिडीत आदिवासीं जनतेवर होत असतांना आपण हे सम्मेलन भरविले आहे. आदिवासींच्या जमिनी, त्यांचे जीवनस्त्रोत आणि उपजीविकेची साधने यांच्यावर बड्या भांडवलदार-दलालांचे आघात जास्तच जोरदारपणे होत आहेत. आदिवासींची संस्कृती आणि अस्मिता यावर धर्मांध शक्तींचे हल्ले वाढले आहेत. २००९ च्या लोकसभा निवडणुकानंतर काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसचे युपीए-२ सरकार केंद्रात स्थापन झाले. महाराष्ट्रात या काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसचे आघाडी सरकार आहे. कम्युनिस्ट, डाव्या आणि धर्मनिरपेक्ष जनवादी पक्षांचा दबाव राहिलेला नाही. त्यामुळे देशी-विदेशी बड्या भांडवलदारांना आणि धनदांडग्या दलाल-मालदारांना अफाट नफा कमावण्यासाठी सरकारने त्यांना मोकाट सोडले आहे. डाव्या पक्षांच्या दबावाखाली आदिवासींना वन आणि वनजमीन यांवर हक्क देणारा कायदा २००६ साली करणे केंद्र सरकारला भाग पडले होते. पण या कायद्याची अंमलबजावणी अत्यंत चुकीच्या अन्यायकारक प्रकारे केली जात आहे. उलट आदिवासी क्षेत्रातील भांडवलदार-मालदारांची आणि ठेकेदार-दलालांची घूसघोरी वाढली आहे.

आदिवासी क्षेत्रात भाजपच्या धर्मांध कारवाया चालू आहेत. आरएसएसच्या संघपरिवाराने आदिवासींची दिशाभूल करून त्यांच्या संस्कृतीला तथाकथित हिंदुत्वाचे बिरूद लावून विकृत करण्याचे

कारस्थान पुढे रेटले आहे. भाजपच्या आघाडी सरकारचा या पूर्वीचा महाराष्ट्रातील अनुभव देखिल नवउदारवादी धोरणांखाली आदिवासींची व श्रमिकांची कमालीची परवड करणाराच होता. इतकेच नव्हे तर आदिवासींना वनामधून हुसकावून लावण्याच्या छळ-कारवाया करण्यात भाजप व काँग्रेस यात उणे-दुणे काही नाही.

आदिवासींमध्ये अस्मितेच्या बहाण्याखाली त्यांना जनवादी-डाव्या चळवळीपासून अलग करणाऱ्या, विदेशी फंडावर पोसलल्या गेलेल्या एनजीओ (स्वयंसेवी संस्था)ची संख्या भरपूर आहे. आदिवासी मुख्यतः श्रमिक आहेत आणि त्यांची बिगर-आदिवासी श्रमिकांबरोबर बलाढ्या एकजूट बांधून त्यांना जनवादी क्रांतीचा हिस्सा केला पाहिजे. परंतु एनजीओज आदिवासींची दिशाभूल करून त्यांना भलत्याच आत्मघातक अस्मितेच्या मागे फरपटत नेतात. श्रमिक म्हणून असणारी त्यांची धारणा पुसट करतात. जनवादी डाव्या चळवळींपासून त्यांना तोडतात. आदिवासी एकतेच्या नावाखाली आदिवासींना काँग्रेस-राष्ट्रवादी-भाजप अशा सर्व नेत्यांच्या छायेखाली झाकून ठेवतात. काही एनजीओज तर डावी-कम्युनिस्ट भाषा वापरून काम सुरू करतात पण प्रत्यक्षात मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षांपासून त्यांची फारकत कशी होईल याचीच काळजी घेतात.

या खेरीज देशातील छत्तीसगढ सारख्या अन्य राज्यांबरोबरच महाराष्ट्रातही काही आदिवासी क्षेत्रात तथाकथित माओवादी भीषण हिंसक कारवाया करत आहेत. अन्याय-जुलुमांविरुद्ध आदिवासी व श्रमिक जनतेने करावयाचा लढाऊ व ऊग्र प्रतिकार आवश्यकच असतो. आणि आपल्या आदिवासी भागातील चळवळीने क्रूर दडपशाहीच्या विरुद्ध नेहमीच कणखर लढाऊ भूमिका बजावल्या आहेत. परंतु माओच्या नावाखाली माओवादी ज्या हिंसक कारवाया करत आहेत त्याचे समर्थन कधीही करता येणार नाही. आदिवासींच्या मुक्तीसाठी आणि क्रांतीसाठी आदिवासींनाच शत्रू ठरवून अत्यंत क्रूरपद्धतीने त्यांच्या बालकांची, महिलांची, वृद्धांची हत्या करणे कोणत्या ''माओवादा''त बसते? एका बाजूने अशा माओवाद्यांच्या तडाख्यात तर दुसरीकडे माओवाद्यांना खतम करण्याच्या उद्देशाने भांडवली शासनाने चालविलेल्या पोलीसी कारवायांमध्ये आदिवासी भरडून निघत आहेत. माओवाद्यांचे उद्दिष्ट आदिवासींना डाव्या जनवादी चळवळीपासून दूर ठेवण्याचे आहे. तर भांडवली शासनाचे धोरण पोलीसी कारवायांचा बडगा उगारण्याचा आहे. काँग्रेस आणि भाजपचे पुढारी अशा भागातून निवडून येऊ शकतात याचा अर्थ स्पष्ट आहे. माओवाद्यांना या पक्षांच्या पुढाऱ्यांशी साटेलोटे करणे यात वावगे काहीच वाटत नाही. आपली भूमिका आदिवासींच्या आणि एकूणच सर्व श्रमिकांच्या हितासाठी अतिशय स्पष्ट आणि योग्य अशी आहे. माओवाद्यांवर राज्यघटनेला धरून आणि आवश्यक अशी खंबीर कायदेशीर कार्यवाही करायला हवी. पण त्याच बरोबरीने माओवाद्यांच्या डाव्या विचारसरणीच्या बुरख्याखाली चाललेल्या जनविरोधी राजकारणाचा मुकाबला राजकीय-वैचारिक संघर्ष करूनच पुढे न्यायला हवा.

आपल्या आजच्या आदिवासी सम्मेलनात आपण आदिवासींच्या मूलभूत अधिकारांबाबत अलिकडच्या काळातील शासकीय धोरणांचा आणि घडामोडींचा कसा परिणाम झाला आहे याची चर्चा केली पाहिजे. आदिवासींचे राजकीय दोस्त कोण आणि शत्रू कोण यांचा परामर्श घेतला पाहिजे. आपण अलिकडे गेल्या दोन-तीन वर्षांत केलेल्या आंदोलनांचा नीट आढावा घ्यायला हवा. आदिवासींची संघटित शक्ती वाढविण्यात आपल्याला मिळालेल्या यशाची नोंद घेत ही शक्ती आणखी कशी बळकट करायची त्याची चर्चा करायला हवी. तसेच आपल्या कमजोऱ्यांवर आणि चुकांवर नेमके बोट ठेवून त्या कमी करण्यासाठी उपाय सुचवायला हवेत. भूमिहीन आदिवासी, वनजमीन कब्जात असणारे, गायरान-सरकारी पडित जमीन धारण करणारे, खाजगी-रेव्हेन्यू जमीनधारक आदिवासी शेतकरी, जंगलात-डोंगराळ-

दऱ्याखोऱ्यांत राहणारे, सपाट प्रदेशात राहणारे, ५व्या अनुसूची क्षेत्रातले, या क्षेत्राबाहेरचे, स्थलांतर करून दूर-दूर भटकंती करणारे, शाळा-कॉलेजमध्ये शिकणारे, शिकून-सवरून बेरोजगार राहिलेले, नोकरी करणारे, गोरगरीबीत खंगलेले आणि मध्यमवर्गीय झालेले, स्त्री आणि पुरुष वृद्ध, तरूण आणि लहान लेकरे — अशा आदिवासीतील सर्व प्रकारच्या घटकांच्या समस्या आणि त्यांच्या मागण्या घेऊन यापुढे आंदोलने कशी संघटित करायची त्याची योजना देखील या सम्मेलनाने ठरवली पाहिजे. या सम्मेलनाने महाराष्ट्रातील आदिवासी (S. T.) आणि भटक्या-विमुक्त जमाती (V. J. N. T.) अशा सगळ्यांची मोठी भक्कम ताकद उभी करण्यासाठी आदिवासी चळवळीचा विस्तार कसा करायचा याबाबत काही ठोस निर्णय घ्यायला हवेत. आदिवासी अधिकार राष्ट्रीय मंचची सभासद नोंदणी महाराष्ट्रात सुरु करावयाची काय याबाबतही चर्चा करायला हवी.

२००२ सालच्या ऐतिहासिक राष्ट्रीय आदिवासी सम्मेलनांतर २०१० साली दिल्ली येथील राष्ट्रीय आदिवासी सम्मेलनात आपण ''आदिवासी अधिकार राष्ट्रीय मंच'' स्थापन केला. या मंचच्या बॅनरखाली महाराष्ट्रात काही मोजके कार्यक्रम आपण आयोजित केले. तथापि रीतसर याच बॅनरचा सातत्याने उपयोग करून राज्यातील आदिवासींची बलाढ्य चळवळ उभी करण्याचे आणि तिला सर्वव्यापी श्रमिकांच्या डाव्या-जनवादी चळवळीचा महत्वाचा हिस्सा बनविण्याचे कार्य अजून खूप अपुरे आहे. आदिवासी नागरिकांचे नव्या जागतिकीकरण-खाजगीकरणाच्या जमान्यात निर्माण झालेल्या समस्यांचा सर्वांगिण अभ्यास करायला हवा. आदिवासींबाबत घेतली जाणारी केंद्र व राज्य भांडवली शासनांच्या धोरणांबाबत परिणामकारक व प्रभावी हस्तक्षेप करण्यासाठी अशा राष्ट्रीय स्तरावरील मंचाची नितांत गरज आहे. तसेच ठिकठिकाणी चाललेल्या आदिवासींच्या चळवळीविषयी परस्परांना नीट माहिती होणे जरूर आहे. स्थानिक पातळीवरचे लढे आणि राज्यस्तरीय लढे यांची सांगड घालण्यासाठी सुद्धा अशा विशेष मंचाची गरज आहेच. चळवळीतील अनुभवांची देवाण-घेवाण अशा मंचाशिवाय पुरेशी होऊ शकत नाही. आदिवासी क्षेत्राचा आणि आदिवासी जनतेच्या चांगल्या विकासासाठी आदिवासी अधिकार राष्ट्रीय मंचला पर्याय नाही हा समज कार्यकर्त्यांमध्ये व जनतेमध्ये खोलवर रुजवण्यासाठी या सम्मेलनाने निर्धार करायला हवा. या दृष्टीने सम्मेलनासमोर चर्चेकरिता ठेवलेल्या या ठरावात काही मांडणी केली आहे. या मांडणीचा उपयोग चर्चेसाठी होईल अशी अपेक्षा आहे.

## महाराष्ट्रातील आदिवासी

महाराष्ट्रात २०११ च्या खानेसुमारीनुसार १ कोटी ५ लाख आदिवासी आहेत. २००१ साली राज्यातील एकूण लोकसंख्येच्या ८.९ टक्के आदिवासी होते. २०११ साली आदिवासींची संख्या वाढून हे प्रमाण ९.४ टक्के झाले. २००१ ते २०११ च्या दरम्यान आदिवासी लोकसंख्येच्या वाढीचा दर २२.५ टक्के एवढा राहिला. देशातील एकूण आदिवासी लोकसंख्येच्या १०.१७ टक्के आदिवासी महाष्ट्रात राहतात. राज्यातील अनेक जिल्ह्यात ४७ मुख्य जमातींचे आणि त्यांच्या उपजमातींचे आदिवासी राहातात. एका सलग पट्ट्यात ते जसे राहतात तसेच विखुरलेल्या खेड्या-पाड्यात आणि मुंबईसह अनेक शहरातही ते आहेत. विदर्भातील गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया, अमरावती, यवतमाळ जिल्ह्यांमध्ये गोंड, माडिया, हलबा, कोल, कोरकू इत्यादि आदिवासी जमाती आहेत. उत्तर महाराष्ट्रातील नंदुरबार, धुळे, नाशिक, अहमदनगर, जळगाव जिल्ह्यात भिल्ल, पावरा, कोकणा, तडवी, मावची, ठाकूर, आदिवासी आहेत. कोंकणातील ठाणे व रायगड जिल्ह्यात वारली, कातकरी तर पुणे जिल्ह्यात महादेव कोळी

आदिवासी राहातात. मराठवाड्यातील नांदेड, परभणी, बीड औरंगाबाद जिल्ह्यात आंध, ठकार, ठाकूर आदिवासी आहेत. नंदुरबार जिल्ह्यात राज्यातील सगळ्यात जास्त म्हणजे ६९.३ टक्के आदिवासी राहतात. त्या खालोखाल गडचिरोली जिल्ह्यात ३८.७ टक्के, धुळे जिल्ह्यात ३१.६ टक्के आणि नाशिक जिल्ह्यात २५.६ टक्के आदिवासी आहेत. या खेरीज भटक्या-विमुक्त जमातींची महाराष्ट्रातील संख्या लक्षणीय असून बंजारा-लमाणी (?), पारधी, कैकाडी, कंजार, डोंबारी अशा जमातीपैकी काही कुटुंबे जरी स्थाईक झाली असली आणि शेती वा इतर उद्योगधंद्यात असली तरी अजुनही त्यांच्यातले बहुसंख्य लोक भटकते जीवन जगतात.

आपले आदिवासींमधील कार्य वारली, गावित, कोंकणी, भिल्ल, महादेव कोळी, कोरकू अशा मोजक्या जमातीतच मुख्यतः सुरू आहे. तसेच ते ठाणे, नाशिक, नंदुरबार, नांदेड, अमरावती, हिंगोली, पुणे याच जिल्ह्यात प्रामुख्याने आहे. या जिल्ह्यातही काही तालुक्यातच आणि गावात-पाड्यांतच ते एकवटले आहे. म्हणजे भौगोलिक दृष्ट्या आणि सगळ्या आदिवासीं जमाती लक्षात घेता अजून खूप लांबचा पल्ला गाठायचा शिल्लक आहे. तसेच भटक्या-विमुक्तांत देखिल आपली पोहोच नगण्यच आहे. बीड, सोलापूर आणि मुंबई येथील काही ठिकाणी पारधी, वडर, कैकाडी आणि मराठवाड्यातील बंजारा-लमाणी यांच्याशी असलेले थोडे-फार संपर्क कार्य वगळता त्यांच्या खास समस्या आणि मागण्या यावर आधारित चळवळीच्या हेतूने आपण फारसे काहीच केलेले नाही.

कॉम्रेड गोदावरी परुळेकर, कॉ. शामराव परुळेकर, कॉ. लहानू कोम, कॉ. धनगर, कॉ. नरेंद्र मालुसरे, कॉ. जीवा पांडू गावीत इत्यादि नेत्यांनी ठाणे आणि नाशिक जिल्ह्यांतील आदिवासींच्या ऊग्र चळवळीची मुहूर्तमेढ रोवली. तिच्या भक्कम पायावर जेवढा विस्तार व्हायला हवा होता तो झाला नाही. गोदुताईंच्या पिढीने आणि त्यांच्या पुढच्या पिढीने आदिवासी चळवळीचे ऐतिहासिक जोमदार संचित निर्माण करून ठेवले आहे. ते टिकवण्याबरोबरीनेच त्याचा विस्तार करण्याची जबाबदारी सम्मेलनात सामील झालेल्या नव्या रक्ताच्या युवक-युवतींनी उचलायला हवी.

आदिवासींच्या जीवनाशी निगडित असलेल्या काही प्रमुख मुद्यांबाबत विचार करूया.

## जमीन-जंगल: आदिवासींचा अतूट जीवनाधार

बहुसंख्य आदिवासींची उपजीविका जमिनीवर केलेल्या श्रमांशी जोडलेली आहे. उपजीविकेचे प्रमुख साधनच जर जमीन-शेती असेल तर महाराष्ट्रातील एकूण जमिनीच्या किती टक्के जमीन राज्यातील ९.४ टक्के आदिवासींच्या वाट्याला आली आहे ते पाहिले पाहिजे. एकतर इंग्रजांच्या परकीय वसाहतवादी राजवटीतच आदिवासी क्षेत्रात सावकार-व्यापाऱ्यांची आणि इंग्रजांनी स्थापन केलेल्या फॉरेस्ट खात्याची घूसखोरी सुरु झाली. या घूसखोरीच्या शोषण-दडपशाहीविरुद्ध आदिवासींनी उत्स्फूर्तपणे देशभर सगळीकडे उठाव केले. महाराष्ट्रालाही अशा आदिवासी विद्रोहांची जाज्वल्य परंपरा आहे. परंतु बळाच्या जोरावर राज्यकर्त्यांनी हे उठाव दडपून टाकले. स्वातंत्र्योत्तर काळातही देशी शासनाकडून आणि सावकार-मालदारांकडून आदिवासी क्षेत्रात घूसखोरी करून त्याच्या जमिनी हिसकावून घेण्याचे कारस्थान चालूच राहिले. त्याविरुद्ध आदिवासींनी कम्युनिस्ट डाव्या शक्तींच्या पुढारपणाने निकराचे लढे केले. आता साम्राज्यवादी जागतिकीकरणाच्या-खाजगीकरणाच्या कालखंडात अशी घूसखोरी व आदिवासींच्या जमिनींवरील आक्रमण अधिकच वेगाने रेटले जात आहे. त्याविरुद्धचा लढा हा आदिवासी क्षेत्रातील संघर्षाचा महत्वाचा व जीवन-मरणाचा मुद्दा बनला आहे. आदिवासींच्या

जमिनीवरून त्यांची हकालपट्टी करून त्यांना वेठबिगारीने राबविण्याची परंपरा खंडित करायची असेल तर जमिनींची समस्या अग्रहक्काने धसाला लावली पाहिजे. आदिवासींनी केलेल्या निरंतर लढाईमुळेच आज वनातील, रेव्हेन्यूच्या, गायरानाच्या, देवस्थानाच्या किंवा सरकारी पडित जमीनी त्यांच्या ताब्यात राहिल्या आहेत. आदिवासींवर अन्याय लादणारे कायदे रद्द करून जमीनींचे कायदेशीर हक्क त्यांना द्या या मागणीवर सातत्याने केलेल्या चळवळींच्या परिणामीच वनाधिकार कायदा झाला. [२००६ चा केंद्र शासनाने केलेला आदिवासी आणि अन्य परंपरागत वननिवासी (वनाधिकार मान्यता) कायदा]. गायरान व सरकारी पडित जमिनी रीतसर करण्याचे कायदे झाले. (१९९० सालचा कायदा). बिगर-आदिवासी सावकारांनी हडप केलेल्या आदिवासींच्या हस्तांतरित जमिनी आदिवासींना परत देण्याचा आणि अशा हस्तांतरवर बंदी आणणारा कायदा महाराष्ट्र शासनाला करावा लागला. (१९७४ चा जमीन महसूल कायदा क्रमांक ३५ आणि १९७५ चा कायदा क्रमांक १४).

परंतु या कायद्यांची अंमलबजावणी अतिशय ढिसाळ पद्धतीने आणि न्याय मिळूच नये या पद्धतीने झाली व होत आहे. भांडवली नोकरशाही आणि राज्यकर्ते केवळ दिरंगाईच नव्हे तर अडथळे तयार करण्यातच मश्गूल आहेत. म्हणून न्याय्य कायद्यांच्या काटेकोर अंमलबजावणीसाठी अतिशय जागरूक राहून आपल्याला लढावे लागत आहे. महाराष्ट्रात वनाधिकार कायद्यानुसार आदिवासी कुटुंबांना त्यांच्या कब्जात असलेल्या वैयक्तिक जमिनींचे वनाधिकार आणि गावात/पाड्यात राहणाऱ्या सर्व आदिवासींना सामुहिक वनाधिकार कोठे किती दिले गेले त्याची आकडेवारी अत्यंत चिंताजनक आणि चीड आणणारी आहे. प्रचंड प्रमाणावर आदिवासींनी केलेले दावे नाकारले गेले आहेत. जिल्ह्यांतील उपविभाग स्तरीय समितीकडून आणि जिल्ह्यास्तरीय समितीकडूनही दावे फेटाळले गेले आहेत. या सम्मेलनात या प्रश्नांवर आपापल्या जिल्ह्यात केलेल्या आंदोलनांविषयी आणि आलेल्या अनुभवांबद्दल चर्चा केली पाहिजे. तसेच आदिवासींच्या आणि भटक्या-विमुक्तांच्या गायरान, सरकारी पडित, देवस्थान व हस्तांतर जमिनीबाबतची परिस्थिती काय आहे तेही बोलले पाहिजे.

**मागण्या:**

वैयक्तिक वनजमीनींच्या फेटाळलेल्या सर्व दाव्यांची पुन्हा तपासणी करा. गुगल मॅप व उपग्रहीय छायाचित्रांच्या प्रतिमा जुळत नाहीत, १३ डिसेंबर २००६ वा १ जानेवारी २००८ ला जमीन ताब्यात असल्याचे पुरावे जोडलेले नाहीत अशा फालतू आणि कायदा-नियम यांचे उल्लंघन करणारी कारणे दाखवून दावे फेटाळणे बंद करा. केवळ फॉरेस्ट खात्याच्या अधिकाऱ्यांचे ऐकून निर्णय देणे थांबवा. गावपातळीवरच्या वनाधिकार समित्या आणि ग्रामसभा यांनी पस्तावित केलेले आणि किमान दोन पुरावे जोडलेले सर्व दावे मान्य करा. केवळ प्रमाणपत्रे नव्हेत तर रीतसार मालकीहक्काची कागदपत्रे द्या. सामुहिक वनाधिकारांची टायटल्स त्वरित सर्व आदिवासी पाड्यांना/गावांना अदा करा. फॉरेस्ट खात्याच्या दबावाखालच्या वन संवर्धन दक्षता कमिट्या बरखास्त करून वनाधिकार कायद्यानुसार ग्रामसभेने बनविलेल्या वन संरक्षण व संवर्धन समित्या तयार करा. या समित्यावर अभयारण्यात गार्ड म्हणून काम करणाऱ्यांना सदस्य म्हणून प्राधान्याने घ्या. गौण वनोपज वस्तूंबाबतचे सर्वाधिकार आदिवासींना द्या. फॉरेस्ट खात्याने घातलेल्या सर्व केसेस मागे घ्या आणि या खात्याची लुडबुड बंद करा. सर्व कोर्टांनी दिलेले मनाई हुकूम उठवून आणि कोर्टातील प्रकरणे रद्द करून, सावकार-व्यापारी-कंपन्या यांनी हडप केलेल्या सर्व जमिनी मूळ आदिवासींना, त्यांच्या वारसांना ताबडतोब द्या. आदिवासी आणि भटक्या-विमुक्तांच्या ताब्यात असणाऱ्या सर्व प्रकारच्या जमीनी रीतसर करून त्यांच्या सिंचनासाठी, कसण्यासाठी

पुरेशा निधीची, अनुदानाची आणि ४ टक्के व्याजदराच्या सुलभ कर्जाची तरतूद करा. महाराष्ट्रातील आदिवासी क्षेत्रामधील जमिनींची सविस्तर मोजणी आणि पाहणी यांची मोहीम राबवा. या मोहिमेत आदिवासी तरूण-तरुणींना प्रशिक्षित करून सहभागी करा. राज्यातील सिलींगच्या आताच्या कायद्यात दुरुस्ती करून अतिरिक्त जमिनीचे आदिवासी आणि भटक्या-विमुक्त कुटुंबांना त्यांचे फेरवाटप करा. जमीन आणि इतर मालमत्तेवर आदिवासी स्त्रिया व पुरुष यांना समान हक्क द्या. विविध कारणामुळे विस्थापित केलेल्या/झालेल्या आदिवासींचे आणि भटक्या-विमुक्तांचे सर्वंकष पुनर्वसन करा.

## आदिवासींचे भवितव्य: टिकाऊ शेती आणि पर्यावरण संतुलन

आदिवासींचे आणि सर्वच माणसांचे जीवन नैसर्गिक संसाधनांच्या काळजीपूर्वक जपणुकीत साठवले आहे. जमीन, जंगल, खनिजे, पाणी, हवामान, सूर्यप्रकाश इत्यादि नैसर्गिक संसाधनांचा नफेखोरीसाठी संपूर्ण विनाश करण्याचे कारस्थान देशी-विदेशी बड्या भांडवलदार वर्गाने रचले आहे. त्यामुळे सर्वच श्रमिकांना आणि विशेषेकरून आदिवासींना या नफेखोरीतून संसाधनांना वाचविण्याची जबाबदारी घ्यावीच लागणार आहे. शेतीची जमीन हिसकावून घेणाऱ्या सावकार-व्यापाऱ्यांच्या विरुद्ध संघर्ष करण्याची खूप दीर्घ अशी ऐतिहासिक परंपरा आदिवासी क्षेत्रात आहेच. पण आता साम्राज्यवादी जागतिकीकरणाच्या कालखंडात अनेक वेगळ्या प्रकारांनी आणि पद्धतींनी ही लढाई लढवावी लागणार आहे. भांडवलदारी शासनाच्या धोरणांच्या विरोधात पर्यायी आर्थिक-राजकीय धोरणांसाठी संघर्ष करीत असतानाच आपली शेती आणि जंगल यांचे टिकाऊ संवर्धन कसे करायचे त्याचे ज्ञान-तंत्रज्ञानही माहित असायला हवे. आता वनाधिकार कायदा आणि रोजगार हमी कायदा यांनी दिलेल्या अधिकारांचा उपयोग करण्याची संधी मिळाली आहे. परंपरागत शेती कसण्याच्या पद्धती, परंपरागत बियाणे, जैविक खते, मिश्रपीकांची आणि पालट पीकांची लागवड यांचे ज्ञान पिढ्यान् पिढ्यांच्या अनुभवातून आदिवासींजवळ आहे. औषधी वनस्पती आणि त्यांचा उपयोग यांचेही ज्ञान आहे. नफेखोर दलालांनी आदिवासींच्या शेतीवर घातक बियाणांचे, महागड्या रासायनिक खतांचे आणि कीटकनाशकांचे हल्ले सुरु केले आहेत. त्यामुळे जमिनी नापीक होऊन मातीचा कसदारपणा धोक्यात आला आहे. मातीचे स्वाभाविक गुणधर्म नाहीसे होत आहेत. पीकांचे उत्पादन रासायनिक शेतीमुळे सुरुवातीला वाढलेले दिसले तरी काही वर्षातच मातीचा पोत बिघडतो, खर्च अवाढव्य वाढतो, कर्जबाजारी व्हावे लागते याचा अनुभव पाठिशी येऊ लागला आहे. म्हणून स्वावलंबी जैविक शेतीबाबत नव्याने निर्माण होत असलेले ज्ञान घेऊन प्रशिक्षित व्हावे लागेल. आपल्या भागातील जमिनीचा, खडकांचा, भूस्तरांचा, जमीनीखालील पाण्याचे साठे आणि प्रवाह यांचा अभ्यास करावा लागेल. माथा ते पायथा एकात्मिक पाणलोट क्षेत्र कसे विकसित करायचे ते शिकून अंमलात आणावे लागेल. जमिनीचा उपयोग करण्याच्या वैज्ञानिक पद्धती समजून घ्याव्याच लागतील. आपले आरोग्य नफेखोर रासायनिक खर्चिक शेतीमुळेच खंगून गेले आहे. भांडवली बाजारपेठेवर अवलंबून राहावे लागत आहे. आदिवासी दुर्गम भागापर्यंत भांडवली बाजारपेठ घुसली आहे. त्याचे भीषण परिणाम आपल्या जीवनावर होत आहेत.

त्याचा मुकाबला करायचा तर जुन्या पारंपरिक ज्ञानाची आणि नव्या उपयुक्त ज्ञान-तंत्रज्ञानाची सांगड घालायला हवी. पारंपरिक बियाणे अजूनही काही आदिवासींनी टिकवून ठेवली आहेत. तिचा उपयोग विकसित केला पाहिजे. नफेखोरीमुळे पर्यावरणात घातक उलथापालथी होत आहेत. त्यांना थोपवण्यासाठी आदिवासी युवक-युवतींनी पुढाकार घ्यायला हवा. वनसंवर्धन आणि सृष्टीतील मूलभूत घटकांचा परस्पर पोषक संबंध सांभाळण्याचे कार्य आदिवासींनीच केल्याची नोंद वनाधिकार कायद्यात घेणे सरकारला भाग

पडले आहे. आता या कायद्यानेच यानंतरही तो सांभाळण्याचे कार्य करण्याची जबाबदारी आदिवासी आणि परंपरागत वननिवासींवर सोपविली आहे. त्याचा पुरेपूर उपयोग करायला हवा. नाशिक जिल्ह्यात अलंगून येथे कॉ. जीवा पांडू गावीत यांनी हजारो सागाची लागवड करून आदिवासी किती कल्पकतेने वनसंवर्धनात भागिदारी करू शकतो ते दाखवून दिले आहे. या प्रेरणादायक उपक्रमातून स्फूर्ती घेऊन अन्य ठिकाणी असे प्रयोग (अर्थात एकसुरीपणा टाळून) करायला हवेत. आदिवासी अधिकार राष्ट्रीय मंचच्या कार्यकर्त्यांनी ही सकारात्मक लढाई करण्यात अग्रभागी राहायचा निर्धार या तलासरी सम्मेलनात घेतला पाहिजे.

**मागण्या:**

आदिवासी युवक-युवतींना टिकावू आत्मनिर्भर शेतीचे प्रशिक्षण देण्यासाठी खास प्रशिक्षण केंद्रे सुरु करा. या प्रशिक्षणासाठी लागणारे शैक्षणिक साहित्य, आणि जीपीएस सारखी उपकरणे पुरवा. या केंद्रात प्रशिक्षित आदिवासी युवक-युवतींची शिक्षक म्हणून नेमणूक करून त्यांना शासकीय नियमाप्रमाणे पुरेस वेतन आणि अन्य लाभ द्या. ग्रामसभांना वनसंवर्धनाची जबाबदारी दिली आहे. त्याकरिता प्रत्येक वस्तीला निधीची तरतूद करा. त्याच धर्तीवर टिकावू शेतीविकास, पाणलोटविकास, वैयक्तिक शेतीचे नेटप्लॅनिंग, पीक आराखड्यांचे नियोजन, खाद्यपदार्थांसाठी करावयाच्या प्रक्रिया आणि एकूण पर्यावरण सांभाळ याकरिता सर्व आदिवासी वस्त्यांसाठी खास निधीची तरतूद करा. अभयारण्यात गार्ड म्हणून काम करणाऱ्या तरुणांना खूप माहिती आहे. त्यांना अशा प्रशिक्षण केंद्रात शिक्षक म्हणून प्राधान्य द्या. केंद्र सरकारच्या वसुंधरा योजनांची व्याप्ती सर्व आदिवासी भागात त्वरित करा. आदिवासी भागातील शेतकी शाळा/कॉलेज या मध्ये असे प्रशिक्षण देणे अनिवार्य करा.

## महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा

केंद्रीय रोजगार हमी कायद्याला अनुसरून महाराष्ट्र शासनाने रोजगार हमीचा नवीन कायदा व योजना तयार केली आहे. या कायद्याची सर्वात जास्त अंमलबजावणी गडचिरोली जिल्ह्यात झाल्याची धादांत खोटी माहिती सरकारने प्रसिद्ध केली आहे. खरे तर या कायद्याच्या काटेकोर अंमलबजावणी आदिवासींसाठी अतिशय उपयुक्त आहे. आदिवासी कुटुंबा कडील जमिनींचे क्षेत्र कमी होत असतांना, भूमिहीनांची संख्या वाढत असतांना आणि यांत्रिकीकरणामुळे स्थानिक रोजगाराच्या शक्यता कमी कमी झाल्या असतांना रोजगार हमी कायद्याची सुयोग्य अंमलबजावणी होणे अत्यंत जरूरीचे आहे. स्थानिक पुरेसा नेहमी चालणारा रोजगार नसल्याने पोट भरण्यासाठी, जगण्यासाठी आदिवासींना रोजगाराच्या शोधार्थ लांब लांब जावे लागत आहे. ठेकेदारांच्या आणि मुकादमांच्या सापळ्यात सापडून आदिवासी अतिकष्टाची कामे वेठबिगारीने उपसत आहेत. वर्षानुवर्षे नियमित स्थलांतर करण्याची पाळी त्यांच्यावर ओढवली आहे. वीटभट्ट्यांवर, खडीसेंटरवर, मासेमारीकरिता, रस्ते-इमारतींच्या बांधकामावर, ऊसतोड-वाहतूकीच्या कामावर, हमाली करण्यासाठी कंपनीत किंवा खाणीत त्यांना दरवर्षी जाणे भागच पडते. दुसऱ्या जिल्ह्यात किंवा राज्यात शेतीतील किंवा मिळेल ते मोलमजुरीचे काम करण्यासाठी जावेच लागते. स्थलांतरित आदिवासींना कित्येक संकटांना तोंड द्यावे लागते. उघड्यावर घाणेरड्या जागेत कुठेही राहावे लागते. ऊन-वारा-पाऊस-थंडी आणि खूप कष्ट यामुळे अनेक तऱ्हेच्या आजारांना बळी पडावे लागते. स्त्रिया व मुलींना अनेकवेळा लैंगिक जुलूम सोसावे लागतात. लहान मुलांच्या शिक्षणाची कायमची आबाळ होत राहते. शिवाय स्थलांतरामुळे रोजगार मिळत असला व कसे-बसे पोट भरता येत असले तरी,

स्वत:चे घर-गाव-परिसर सोडून दूर आल्यामुळे सामुहिक-सांस्कृतिक आनंद आणि समाधान यांना पार मुकावे लागते. या खेरीज कर्जाचा डोक्यावरील बोजा वाढतच जातो. मुकादम-ठेकेदार-सावकार यांचे व्याज फेडण्यातच आयुष्य संपून जाते.

या अमानुष जीवन-संकटांतून दिलासा देण्यासाठीच डाव्या पक्षांच्या दबावाखाली २००५ साली रोहयोचा कायदा केंद्र सरकारने केला. परंतु आदिवासींमधीलच कारभारी, नोकरशहा, पोस्ट-बँकेतले भ्रष्ट अधिकारी, नादान कर्मचारी यांच्या संगनमताने या कायद्याची पुरती वाट लावली आहे. रोजगार हमीसाठी केंद्राकडून येणारा पैसा आणि राज्य सरकारकडे एकत्रित निधीतून रोहयोसाठी उपलब्ध होणारा पैसा भरपूर आहे. परंतु त्याचा उपयोग करून आदिवासींचे जीवनमान सुधारण्याऐवजी एकतर हा पैसा पडून राहतो किंवा भ्रष्टाचारात हडप केला जातो. तद्दन खोट्या नोंदी वेबसाईटवर टाकून रोहयोतून कामे पूर्ण झाल्याची आणि आदिवासी मजुरांना पैसे वाटप केल्याची बोगस मस्टर्स तयार केली जातात. नंदुरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा तालुक्यात अशा भ्रष्ट प्रकरणांचा छडा लावण्याचे चांगले काम कार्यकर्त्यांनी केले आहे. ह्या कायद्याने आणि या कायद्यासाठी केंद्रीय ग्रामीण मंत्रालयाने लागू केलेल्या मार्गदर्शक सूत्रांनी आदिवासी डोंगराळ भागाकरिता विशेष वेतनाची तरतूद केली आहे. रोहयोच्या कामातून ८० टक्के कामे जलसंधारण विकासाशी संबंधित घेण्याचे बंधन आहे. आदिवासींच्या जमिनीची बांधबंदिस्ती आणि त्यांच्या जमिनीवरील शेतीसाठी आवश्यक अन्य कामे याकरिता रोहयोचा निधी अग्रक्रमाने वापरण्याची सोयही केली आहे. रोहयोचा ५० टक्के निधी ग्रामसभेने नियोजित कामांचे प्रस्ताव करून उपयोगात आणायचा आहे.

कायद्यानेच आता किमान वेतनाची हमी दिली आहे. म्हणजे केलेल्या कामाचे मोजमाप घेऊनच वेतन अदा करायचे असले तरी (अंगावरचे कामच रोहयोने मुख्यत: दिलेले आहे), रोज आठ तास काम केल्यावर कमीत कमी सध्या महाराष्ट्रात १६२ रुपये रोजचे वेतन द्यायलाच हवे. आदिवासी भागात काही ठिकाणी खड्डे खणून रोपे लावण्याचे कामावर यापेक्षाही अधिक वेतन मिळाल्याची उदाहरणे आहेत. पण अन्य कामे एकतर मागणी करूनही काढली जात नाहीत. जर काम मिळालेच तर ते फक्त थोड्या दिवसांसाठी थोड्या लोकांनाच मिळते. आणि वेतर वेळेवर कधीच मिळत नाही. उशीरा मिळणारे वेतन देखिल अतिशय कमी पडते. केवळ वीस-पंचवीस रुपये रोज पडल्याची उदाहरणे अनेक आहेत. कायद्यानुसार काम पुरवले नाही तर बेरोजगार भत्ता दिला पाहिजे तो कोठेही दिला जात नाही. उलट बेरोजगार भत्ता देऊ नका, जास्त काम केले असेल तरी किमान वेतनापेक्षा जास्त वेतन देऊ नका, वगैरे अन्यायकारक फतवे आयुक्तांच्या पातळीवरील वरीष्ठ अधिकाऱ्यांकडूनही काढले जातात.

आदिवासी क्षेत्रात आणि कुठेही राहणाऱ्या आदिवासींसाठी आणि भटक्या-विमुक्तांसाठी त्यांना सोयीचे जाईल, करता येईल अशी कामे काढण्याची गरज आहे. परंपरागत कामाच्या सवयीपेक्षा वेगळे काम करायला सांगितले तर ते नीट करता येत नाही. स्त्रियांना द्यावयाची कामे कोणती असावीत याबाबतही त्यांचा सल्ला घेऊन कामे पुरविली पाहिजेत वेतनाचे दर कायद्याच्या मार्गदर्शक सूत्रानुसार ज्या त्या तालुक्यातील परिस्थिती लक्षात घेऊन ठरवायला हवेत. नांदेड वगळता ते महाराष्ट्रात कुठेही ठरविले गेलेले नाहीत. रोहयो कामाची गरज मुद्दाम होऊन निर्माण करण्याची सुद्धा आवश्यकता आहे. म्हणजे आदिवासींना रोहयोवर काम करावेसे वाटेल आणि स्थलांतरित वेठबिगारीच्या विळख्यातून मुक्त होण्यासाठी रोहयो आपलीशी वाटेल असे प्रयत्न केले पाहिजेत. यासाठी सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे पुरेसे वेळेवर वेतन मिळण्याची हमी हेच आहे. त्यासाठी लक्ष केंद्रित करावे लागेल. आपण आतापर्यंत

आदिवासींसाठी रोहयोचा मुद्दा घेऊन केलेल्या कार्याची परखड तपासणी केली पाहिजे. जे कार्य केले असेल त्याच्या अनुभवाची चर्चा करून याबाबत जी फारमोठी कमजोरी राहिली आहे ती दूर करण्यावर उपाय सुचवायला हवेत. या सम्मेलनात अशी चर्चा होऊन उपयुक्त सूचना केल्या तर रोहयो कायद्याच्या अंमलबजावणीला चांगली दिशा मिळू शकेल.

**मागण्या:**

आदिवासींचे स्थलांतर रोखण्यासाठी रोहयोचा निधी पुरेपूर वापरा. यामध्ये भ्रष्टाचार करणाऱ्यांना कडक शासन करून हडप केलेला पैसा वसूल करा. रोहयोच्या वेतनाचे दर ठरविण्यासाठी कायद्याच्या मार्गदर्शक सूत्रानुसार प्रत्येक तालुक्यात जोरदार मोहिम राबवा. या मोहिमेत आदिवासी युवक-युवतींना पुढाकार देऊन सामील करा. आदिवासींना पिण्यासाठी आणि त्यांच्या शेतीच्या सिंचनासाठी स्वच्छ चांगले पाणी मिळेल यादृष्टीने जलसंधारणाची कामे रोहयोमार्फत काढा. आदिवासी दुर्गम क्षेत्रातील पाड्या-पाड्यांना जोडणारे आणि लहान रस्ते, मोठ्या रस्त्यांना जोडणारे रस्ते यांचे बांधकाम ते बाराही महिने वाहतूकीस उपयोगी पडतील अशा पद्धतीने, केंद्र सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाने नुकत्याच जाहीर केलेल्या रोहयोच्या खास निधीतून ताबडतोब सुरु करा. असे रस्ते ठेकेदारांना देऊ नका आणि यंत्रांचा वापर आदिवासी क्षेत्रात करायला बंदी घाला. अत्यंत आवश्यक अशा कामासाठीच यंत्रांचा माफक वापर करा. आदिवासी शेतकऱ्यांच्या जमिनींच्या शेतीविकासाकरिता करावयाची सगळी कामे रोहयोतून सुरू करून त्यासाठी पुरेसा निधी द्या. ज्या त्या भागात राहणाऱ्या आदिवासी मजुरांचा आणि विशेषत: आदिवासी स्त्रियांचा सल्ला घेऊन त्यांना सोयीची होतील अशी कामे रोहयोत समाविष्ट करा. कामाची मागणी करूनही काम पुरविले गेले नाही अशा सर्व आदिवासी मजुरांना आतापर्यंतचा सर्व बेरोजगार भत्ता द्या. रोहयोमुळे आदिवासी भागातील आदिवासींचे स्थलांतर किती कमी झाले हे पाहण्यासाठी समित्या तयार करा. या समित्यांवर आदिवासी क्षेत्रात काम करणाऱ्या जनवादी कार्यकर्त्यांना सदस्य म्हणून घ्या. आदिवासी ग्राम रोजगार सेवक/सेविका यांना सरकारी कर्मचाऱ्याचा दर्जा देऊन दरमहा किमान दहा हजार रुपये वेतन द्या.

## स्थलांतरित आदिवासी मजुरांची वेठबिगार

स्थानिक रोजगाराच्या आणि उपजीविकेच्या साधनांच्या अभावामुळे पुन:पुन्हा स्थलांतर करणाऱ्या आदिवासी आणि भटक्या-विमुक्तांना कायदेशीर संरक्षण मिळण्याची फार मोठी आवश्यकता आहे. आज अस्तित्वात असलेल्या कायद्यांची अंमलबजावणी करण्यात कामगार खात्याच्या अधिकाऱ्यांचे संपूर्ण दुर्लक्ष आहे. स्थलांतरित आदिवासी महाराष्ट्राच्याच अन्य जिल्ह्यांत जसे कामाला जातात तसेच त्यांना राज्याबाहेर इतर राज्यात -गुजरात, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, कर्नाटक, तामीळनाडू इत्यादि -जावे लागते. ठेकेदार-मुकादमांच्या जोडीनेच साखर कारखाने आणि इतर कंपन्यात अत्यंत स्वस्तात मिळणारे मजूर म्हणून आदिवासींचे पराकोटीचे शोषण केले जाते. खाणी-कंपन्या-कारखाने अशा संघटित क्षेत्रात कॉंट्रॅक्ट व कॅज्यअल लेबर म्हणून आदिवासी श्रम करतात तसेच असंघटित क्षेत्रात प्रामुख्याने त्यांना राबवून घेतले जाते. गाव सोडून कामावर जातांना व परततांना अपघात झाला तर फार हाल होतात. प्रवासातील किंवा कामावर असतांना अपघात झाल्यामुळे मृत्यू घडला किंवा दुखापती झाल्या तर त्यांना कोणतीही नुकसान भरपाई वा वैद्यकीय इलाजाकरिता खर्चाची रक्कम मिळत नाही. संघटित व असंघटित अशा दोन्ही क्षेत्रात त्यांना कोणतेही कायदेशीर संरक्षण देण्याची खास व्यवस्था शासनाने केलेली नाही. आपण करीत असलेल्या चळवळीमुळे सामाजिक सुरक्षा हा शब्दही आदिवासींना आता आता थोडासा कळू लागला आहे.

किमान वेतन कायदा, काँट्रॅक्ट लेबर (अबॉलिशन) कायदा, फॅक्टरी ॲक्ट, इंडस्ट्रीयल डिस्पुट ॲक्ट, इंटरस्टेट मायग्रंट लेबर ॲक्ट, वेठबिगारी व बालमजूर निर्मूलन कायदे इत्यादि कायद्यांची अंमलबजावणी झाली तर निदान आदिवासी स्थलांतरित मजुरांना थोडासा तरी दिलासा मिळू शकेल. या सम्मेलनात स्थलांतरित मजुरांच्या समस्यावर, आपण त्यांच्याकरिता केलेल्या चळवळीच्या यशापयशाविषयी चर्चा करून त्यांच्या ठोस मागण्या धसाला लावण्याबद्दल उपाय सुचविणे महत्वाचे आहे.

**मागण्या:**

स्थलांतरित आदिवासी मजुरांची नोंदणी प्रत्येक जिल्ह्याच्या कामगार अधिकारी कार्यालयात आणि तहसील कचेरीत करणे बंधनकारक करा. जे मुकादम/ठेकेदार/कंपन्या अशी नोंदणी न करता मजुरांना घेऊन जातील त्यांचे परवाने रद्द करा व त्यांच्यावर कारवाई करा. प्रत्येक ग्रामपंचायतीच्या नोटीस बोर्डावर स्थलांतर केलेल्या मजुरांच्या नावांची, त्यांना घेऊन जाणाऱ्या मुकादम/ठेकेदारांच्या नावे-पत्यांची आणि ते कोठे किती दिवसांसाठी गेले त्याची यादी प्रसिद्ध करण्याचे आदेश काढा. स्थलांतरित मजुरांना ते जातील त्याठिकाणी रेशनचे अंत्योदय दराचे धान्य पुरवा. अस्तित्वात असलेल्या कायद्यांची अंमलबजावणी कामगार अधिकारी कार्यालयाने करण्याकरिता विशेष सूचना देऊन त्यासाठी खास अधिकाऱ्यांची/कर्मचाऱ्यांची भरती करा. स्थलांतरित मजुरांसाठी विशेष सामाजिक सुरक्षा देणारा कायदा करा.

## शिक्षण आणि सुशिक्षित आदिवासींची बेरोजगारी

शैक्षणिक दृट्या महाराष्ट्रातील आदिवासी आणि भटक्या-विमुक्त जातीतील मुला-मुलींना अतिशय वाईट हालाखीला तोंड द्यावे लागत आहे. एका  बाजूने सर्वशिक्षण अभियानाची घोषणा करावयाची आणि प्रत्यक्षात मात्र शासनाने शिक्षण क्षेत्रातही खाजगीकरणाचा सपाटा सुरू करून शिक्षण देण्याची जबाबदारी झटकून टाकल्यामुळे आदिवासींच्या शिक्षणाचा प्रश्न जास्तच गंभीर झाला आहे. आदिवासी मुला-मुलींचे शाळा व कॉलेज अर्धवट सोडून जाण्याचे (ड्रॉप आऊट) प्रमाण गंभीर आहे. गळती होण्याचे प्रमाण आहे – प्राथमिक ४ थी पर्यंत ११.२ टक्के, ७ वी पर्यंत ५९.९ टक्के आणि १० वी पर्यंत ७२ टक्के. प्राथमिक शाळांची संख्या आणि अवस्था भयानक आहे. आश्रमशाळा काही चांगले अपवाद वगळता अनागोंदी, अपुऱ्या सुविधा आणि भ्रष्टाचार यामुळे बदनाम झाल्या आहेत. स्वच्छ पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, वीज-दिवाबत्ती यांच्या सुविधा नाहीत. पोटभर चांगले पौष्टिक जेवण दिले जात नाही. कपड्यांचा एकच ड्रेस वर्षानुवर्षे मुलींना वापरायला लागल्याची धक्कादायक उदाहरणे देखिल आहेत. विद्यार्थी संघटनांनी केलेल्या पाहणीत शरम वाटावी आणि संताप यावा अशा गोष्टी आढळून आल्या आहेत. खुद्द आदिवासीमधूनच सुशिक्षित झालेल्या भांडवली पक्षाच्या पुढाऱ्यांनी आश्रमशाळांसाठी वस्तू खरेदी करतांना केलेले भ्रष्टाचार चव्हाट्यावर आले असतांना देखिल भ्रष्टाचारी महाभाग मंत्रीपदे भूषवित आहेत! तंत्रव्यावसायिक शिक्षण देणाऱ्या माध्यमिक शाळा, आयटीआय, शेतकी शाळा व शेतकी महाविद्यालये आदिवासी दुर्गम भागात सुरु करणे आवश्यक असतांना त्याकडे अक्षम्य दुर्लक्ष झाले आहे. महाविद्यालये, विद्यापीठे आणि अभियांत्रकी-वैद्यकीय-फार्मासिटीकल वगैरे शिक्षणसंस्थांत आदिवासींसाठी असलेल्या राखीव जागांची संख्या खूपच कमी आहे. उच्च शिक्षणात प्रवेश मिळविण्याकरिता, संशोधनासाठी, एमपीएससी/युपीएससी सारख्या कोर्सेससाठी अत्यंत महागड्या कोचिंग क्लासेसमध्ये

प्रवेश घेणे आदिवासी युवक-युवतींना दुरापास्त आहे. सर्व अडचणीवर मात करून तरीही आदिवासी शिक्षण घेत आहेत. पदवीधारक सुशिक्षित आदिवासी तरूणांना योग्य रोजगार उपलब्ध करून देण्याची जबाबदारी शासनाची आहे. परंतु खुद्द शासकीय सेवांतील आदिवासींच्या राखीव जागांचा बॅकलॉगच वाढत चालला आहे. खासगी उद्योग आणि संस्थामध्ये आदिवासी हाताच्या बोटावर मोजता येतील एवढेही दिसत नाहीत.

## मागण्या:

आदिवासी रहात असलेल्या सर्व वस्त्यांवर २५ मला-मुलींसाठी एक सर्व सुविधांनी युक्त अशी प्राथमिक शाळा सुरु करा. बालवाड्या आणि आंगणवाड्यांची संख्या वाढवा. आश्रमशाळांची संख्या वाढवा. आदिवासी भागातील आश्रमशाळा आणि वसतीगृहे यांना वाढीव अनुदान द्या. शिष्यवृत्तीची रक्कम महागाईनुसार वाढवून द्या. आदिवासी बोली भाषेतील आणि देवनागरी लिपीतील पुस्तके देऊन ती भाषा बोलणाऱ्या आदिवासी युवक-युवतींची शिक्षक म्हणून नेमणूक करा. तंत्रव्यावसायिक शाळा, शेतकी शाळा-कॉलेजेस, आयटीआय यांची संख्या वाढवून तेथे सुसज्ज वसतीगृहांची सोय करा. उच्च शिक्षण, संशोधन आणि एमपीएससी/युपीएससी साठी कोचिंग क्लासेस आदिवासी भागात मोफत वा माफक फी घेऊन सुरु करा. भटक्या-विमुक्तांच्यासाठी या सर्व शैक्षणिक सोयी-सुविधा उपलब्ध करून द्या. सर्वशिक्षाअभियानांतर्गत शालेय पोषण आहार व अन्य उपक्रमात भ्रष्टाचार करणाऱ्या मुख्याध्यापकांवर आणि संबंधित अधिकाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई करा. शासकीय सेवामधील आदिवासींचा बॅकलॉग कालबद्धरीत्या भरून काढा. तो न भरणाऱ्या अधिकाऱ्यांना बडतर्फ करा. खासगी उद्योग/संस्थामध्ये आदिवासींसाठी राखीव जागा ठेवून त्या भरण्याचे धोरण घेऊन ते त्वरित अंमलात आणा. आदिवासी व भटक्या-विमुक्तांकरिता खेळातील प्राविण्य विकसित करण्यासाठी विशेष व्यायामशाळा आणि क्रिडांगणे तयार करून त्यांना प्रशिक्षित करण्यासाठी तज्ञ शिक्षकांची नेमणूक करा.

# कुपोषण, अनारोग्य आणि अन्नाची असुरक्षा

आदिवासींमधील आराग्याची समस्या दिवसेदिवस जास्तच बिकट होत चालली आहे. मलेरिया, क्षय, खरूज, डेंग्यू या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर आढळून येतात. दमा, हगवण, फीट येणे, लकवा यांचे प्रमाणही पूर्वीपेक्षा वाढले आहे. अनेक आदिवासी जमातीत ‘सिकल सेल‘ची गंभीर समस्या आहे. कॅन्सरचे रोगी लक्षात येण्याचे प्रकार वाढले आहेत. ब्लड प्रेरश आणि डायबेटिस असणाऱ्या आदिवासींची संख्या वाढताना दिसते आहे. ४७ टक्क्याहून अधिक आदिवासी स्त्रिया रक्तपांढरी आणि मुरलेल्या अशक्तपणा यामुळे हैराण होत आहेत. वारंवार उद्भवणारे आणि टिकून राहिलेले कुपोषण ही नेहमीचीच गोष्ट झाली आहे. ७६.७ टक्के आदिवासी देशात कुपोषणग्रस्त आहेत. ८४ टक्के आदिवासी घरांना पिण्याचे स्वच्छ पाणी मिळत नाही. ९३ टक्के आदिवासी कुटुंबांना स्वच्छतागृहे नाहीत. ग्रामीण आरोग्य सांख्यिकी बुलेटीनमधील अहवालानुसार आदिवासी क्षेत्रात गरजेपेक्षा प्राथमिक आरोग्य केंद्रांची आणि उपकेंद्रांची संख्या १९ टक्क्यांनी कमी आहे. तर कम्युनिटी आरोग्य केंद्रे २५ टक्क्यांनी कमी आहेत. अर्थात कागदोपत्री उपलब्ध असणाऱ्या आरोग्य केंद्रात देखिल ५० टक्के परिचारिका नाहीत. डॉक्टरांच्या नेमणूकाच केलेल्या नाहीत किंवा नेमणूक केलेल्या डॉक्टरांनी गैरहजर रहायचे असते असाच नियम झालाय. अत्यावश्यक औषधांचा तुटवडा आणि आरोग्य तपासणीसाठी लागणाऱ्या साधनसामुग्रीचा अभाव ही रड सगळीकडेच आहे. वैद्यकीय सेवेचे झपाट्याने खाजगीकरण झाल्याने

आणि खाजगी डॉक्टरांचा सुळसुळाट झाल्याने आदिवासी रोग्यांना आणि त्यांच्या कुटुंबियांना ही सेवा परवडेनाशी झाली आहे. महागडी औषधे आणि नको त्या चाचण्या यामुळे आदिवासी पूर्ण उपचार घेऊच शकत नाहीत. ट्रीटमेंट अर्धवट सोडून देणे त्यांना भाग पडते. आधीच अशक्तपणा आणि सिकल सेल यामुळे प्रतिकार शक्ती कमी झालेली असतांना हाय पॉवरच्या गोळ्यांचे दुष्परिणाम फारच जाणवू लागले आहेत.

परंतु आरोग्य नुसत्या औषधोपचार आणि वैद्यकीय सेवांवर अवलंबून नसते. पोषणाची मूलभूत आवश्यकता अन्नधान्य आणि इतर जीवनावश्यक खाद्य पदार्थ यांच्याशी जोडलेली आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्था मोडीत काढण्याच्या धोरणांचे अतिशय भयानक परिणाम आदिवासींत जाणवत आहेत. सर्वसाधारण आदिवासींच्या आहारात प्रोटीन्स, लोह, आयोडिन आणि व्हिटॅमिन्स यांचा फार अभाव असतो. बिगर-आदिवासी लोकांशी तुलना करता आदिवासींमध्ये कॅलरीजचे प्रमाण देखिल १२ टक्क्यांनी कमी आहे. महाराष्ट्रातील कोरकू, कोल आणि कातकरी-कातोडी या आदिवासी जमातींतील अनेकांना तर एकवेळचे साधे जेवणही घेता येत नाही. सर्वोच्च न्यायालयाने नेमलेल्या सक्सेना समितीने आदिवासी समुहांना द्यावयाच्या दारिद्र्यरेषेच्या कार्डाबद्दल महत्वाच्या सूचना केलेल्या आहेत. सरकारी नोकरीत असणाऱ्या आदिवासी व्यक्तींची कुटुंबे सोडून उरलेल्या सर्व आदिवासी कुटुंबांना पिवळी कार्डे अदा करावीत अशी शिफारस सक्सेना समितीने केली. परंतु शासनाने ती धुडकावून लावली. आदिवासी क्षेत्रातील कुपोषणाच्या समस्येची गंभीर दखल घेत सर्वोच्च न्यायालयाने शासनाला खडसावून सांगितले की, सरकारी नोकरदारांना वगळून बाकी सर्व आदिवासींना अंत्योदय दराने अन्नधान्याचा पुरवठा करावा. तथापि हा न्यायालयाचा सहवेदनेचा आदेश देखिल केंद्र शासनाने जुमानला नाही. उलट जागतिक बँकेच्या आदेशांपुढे मान तुकवून शासन बीपीएल कुटुंबांची संख्या कमीत कमी करण्यासाठी धडपडत आहे.

आता २०१४ सालच्या निवडणुकांमध्ये बाजी मारण्याच्या उद्देशाने अन्न सुरक्षा विधेयक मंजूर करून दोन-तीन रुपये किलो दराने दरमहा ३५ किलो धान्य देण्याच्या घोषणा रोज केल्या जात आहेत. दारिद्र्यरेषेसाठी सर्व्हे करतांना केद्र शासनाने घालून दिलेल्या विचित्र निकषामुळे बहुसंख्य आदिवासी कुटुंबे वगळली जाण्याची शक्यता आहे. केंद्रीय आदिवासी मंत्रालयाने दिलेल्या आकडेवारीनुसार महाराष्ट्रात ग्रामीण भागात राहणाऱ्या आदिवासींपैकी ५६.६ टक्के आणि शहरी भागात ४०.४ टक्के दारिद्र्यरेषेखाली येतात. अन्न सुरक्षा कायद्याप्रमाणे ग्रामीण भागातील ७० टक्के तर शहरी भागातील ५० टक्के लोकांना अन्न सुरक्षा मिळणार आहे. परंतु खरोखर ते कोणाला कोणत्या सर्व्हेनुसार मिळणार याचा गोंधळ खुद्द शासन-प्रशासनातच आहे. शिवाय ही सुरक्षा प्रत्यक्ष अंमलात आणण्याची आर्थिक जबाबदारी राज्य सरकारांवर टाकण्यात आली आहे. कॉम्रेड जीवा पांडू गावीत यांच्या पुढाकाराने आणि सातत्याच्या चळवळीवर आधारलेल्या पाठपुराव्याने नाशिक जिल्ह्यात सर्वप्रथम रेशनचे घरपोच धान्य देण्याची सुरुवात नाशिक जिल्ह्यात झाली. आणि नंतर महाराष्ट्र शासनाने तसा शासकीय आदेश सर्व महाराष्ट्रासाठीही काढला. तथापि त्याची अंमलबजावणी केली नाही. आता पुन्हा प्रत्यक्ष अन्नधान्य देण्याऐवजी पैसे बँक खात्यात थेट जमा करू अशाही वल्गना केल्या गेल्या आहेत. म्हणजे खुल्याबाजारपेठेचाच पुरस्कार चालू आहे. अशा स्थितीत अन्न सुरक्षेचा अधिकार आणि आरोग्याचा अधिकार प्रत्यक्षात घेण्यासाठी आदिवासी आणि बिगर-आदिवासी श्रमिकांची मोठी चळवळ उभारावी लागणार आहे.

**मागण्या:**

सर्व आदिवासी कुटुंबांना कोणताही भेदाभेद न करता दरमहा ३५ किलो स्वच्छ, पोषणयुक्त धान्य दोन रुपये दराने घरपोच पुरवा. रेशनच्या धान्याबरोबरीनेच प्रोटीन्स आणि अन्य पोषक द्रव्ये असणाऱ्या डाळी, गुळ, शेंगदाणे, तेल इत्यादि जीवनावश्यक वस्तूंचा माफक दरात पुरवठा करा. सार्वजनिक आरोग्य केंद्रांना सुसज्ज करून त्यांची पुरेशी संख्या वाढवा. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानातील आशा वर्कर्स आणि पाडा सेवक यांना सरकारी कर्मचाऱ्यांचा दर्जा देऊन त्याना प्रशिक्षित करा. आदिवासी भागात राहून वैद्यकीय सेवा देण्याची तयारी आणि पात्रता असलेल्या वैद्यकीय पदवीधरांच्या आणि परिचारिकांच्या नेमणुका करून त्यांना आवश्यक सर्व सुविधा पुरवा.

## भारतीय संविधानातील मार्गदर्शक सूत्रांचा भंग

राज्यघटनेचे कलम ४६ सांगते की, ''राज्यसत्ता जनतेच्या दुर्बल घटकांचे आणि विशेषेकरून अनुसूचित जाती आणि जमाती यांचे शैक्षणिक आणि आर्थिक हितसंबंध विकसित करेल; तसेच सामाजिक अन्याय आणि शोषणाच्या सर्व प्रकारांपासून त्यांचे संरक्षण करेल''. राज्यघटनेने अतिशय स्पष्टपणाने मांडलेल्या दिशादर्शक तत्वसूत्रांत आदिवासींच्या विकासाकरिता विशेष क्षेत्रांची निर्मिती केली आहे. राज्यघटनेत पाचव्या आणि सहाव्या अनुसूचित क्षेत्रांची रचना केली आहे. महाराष्ट्र राज्य पाचव्या अनुसूची क्षेत्रात येते. या क्षेत्राबाहेर विखुरलेले सुद्धा आदिवासी आहेत. पण त्यांची संख्या कमी आणि विखुरलेली आहे. राज्य सरकारांनी 'आदिवासी सल्लागार मंडळ स्थापन करायचे आहे. या मंडळात आदिवासी आमदार सदस्य असतात. त्याप्रमाणे असे मंडळ महाराष्ट्रात आहे. आदिवासी सल्लागार मंडळांनी वारंवार किमान सहा महिन्यांतून एकदा आदिवासी भागातील स्थितीसंबंधी पाहणी करून, आढावा घेऊन राज्यपालांकडे अहवाल सादर करायला हवा. राज्यपालांनी या अहवालावर सूचना व शिफारसी नोंदवून राष्ट्रपतींकडे पाठवायला हवा. राष्ट्रपती केंद्रीय मंत्रीमंडळाकडे आणि पर्यायाने संसदेकडे उचित अशा शिफारसींची अंमलबजावणी करण्याकरिता पाठवू शकतात.

आदिवासी क्षेत्रांच्या विकासांकरिता १९७४-७५ पासून खास आदिवासी उपयोजना तयार करण्यात आली आहे. या उपयोजने अंतर्गत केंद्र शासनाने देशभरातील आदिवासी लोकसंख्येच्या प्रमाणात आणि राज्य सरकारांनी त्या त्या राज्यातील आदिवासी लोकसंख्येच्या प्रमाणात, दरवर्षीच्या अर्थसंकल्पात निधीची तेवढी तरतूद करणे आवश्यक आहे. राज्यघटनेचे कलम २७५ (१) नुसार आदिवासी उपयोजनांसाठी केंद्राने विशेष केंद्रीय सहाय्य आणि ग्रँटची तरतूद करायलाच हवी.

आदिवासी उपयोजनेसाठी निधी राखून ठेवण्यासाठी राज्यांना केंद्रीय नियोजन आयोगाने मार्गदर्शक सूत्रे दिली आहेत. एकूण राज्य योजनेच्या आवाक्यापासून वेगळा असा हा निधी, अर्थसंकल्पीय संहिता ७९६ खाली राखून ठेवण्यास सांगितले. आयोगाच्या या मार्गदर्शक सूत्रांनुसार आदिवासी उपयोजनेचा निधी राज्यांनी दुसरीकडे वळविता कामा नये किंवा पडूनही ठेवता कामा नये असे स्पष्ट केले आहे. राज्यांतील आदिवासी उपयोजना तयार करणे आणि अंमलात आणणे याकरिता आदिवासी कल्याण विभागाने 'नोडल एजन्सी' म्हणून काम करायचे आहे.

१९९९ साली आदिवासींच्या कल्याणासाठी एका स्वतंत्र केंद्रीय आदिवासी मंत्रालयाची स्थापना करण्यात आली. राज्यघटनेच्या कलम ३३८ मध्ये दुरुस्ती करून आणि नवे कलम ३३८ (अ) समाविष्ट करून,१९ फेब्रुवारी २००४ पासून फक्त आदिवासींसाठी (याआधी आदिवासी आणि दलितांसाठी संयुक्त

होती) एका स्वतंत्र अशा 'अनुसूचित जमातीसाठी राष्ट्रीय आयोगा'ची स्थापना करण्यात आली. [राज्यघटना (८९वी दुरुस्ती) कायदा, २००३].

१९९५ नंतर संविधानातील तत्वे गुंडाळून ठेवण्याला जणु अधिमान्यताच मिळाली. खुद्द केंद्र सरकारच आदिवासी क्षेत्रांच्या विकासाविषयी बेफिकीर नव्हे तर जाणून बुजून दुर्लक्ष करू लागले. नवउदार धोरणांच्या रेट्याखाली देशातील सर्वच उपेक्षित सामाजिक घटकांना भरडले जाऊ लागले. आदिवासींसाठी करावयाच्या अर्थसंकल्पीय निधीची तजवीज एक औपचारिक विधी ठरू लागली. सत्ताधारी वर्गांची दुष्ट रणनीती अर्थसंकल्पातून उघड झाली. रुपयांच्या रकमेच्या आंकड्यांची संख्या फुगवून दाखविण्याचे कसब मंत्रीगणांनी दाखविले तरी प्रत्यक्षात कपातीची कुऱ्हाड चालविली. म्हणजे एका बाजूला संघर्ष आणि डाव्या-पुरोगामी पक्ष संघटनांच्या दबावाखाली आदिवासीसाठी राज्यघटनेत दुरुस्त्या, नवे मंत्रिमंडळ, वनाधिकारांसारखे नवे कायदे, 'संजीवनी योजने'सारख्या अभिनव योजना, स्वतंत्र आयोग, विकास-महामंडळे, खास निधीची तरतूद करायची आणि दुसऱ्या बाजूने साम्राज्यवादी जागतिकीकरणाच्या दबावाखाली आदिवासींना उसकटून दशदिशांना भिरभिरायला लावायचे, अशी ही कुटील राजकीय नीती आहे.

संविधानाला डावलून आदिवासी लोकसंख्येच्या प्रमाणात अंदाजपत्रकीय निधीची तरतूद केली जात नाहीच. आणि आदिवासींसाठी प्रत्यक्षात खर्च केलेला निधी, अंदाजपत्रकीय वितरणाशी कधीही जुळलेला नाही. यात भरीस भर म्हणजे भ्रष्टाचारात आकंठ बुडालेल्या प्रशासकीय नोकरशहाकडून शासनामार्फत येणारा निधी वापरलाच जात नाही. पडून राहतो. जर वापरलाच गेला तर भलत्याच कारणांसाठी आणि बिगर-आदिवासी क्षेत्राच्या भल्यासाठी वापरला जातो.

आदिवासी उपयोजना राबविण्यासाठी प्रत्येक मंत्रालयाने/खात्याने त्यांच्या वार्षिक अंदाजपत्रकांत आदिवासींसाठी त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात नियोजित निधीची तरतूद करणे आवश्यक आहे. केंद्र सरकारच्या ८३ खात्यापैकी फक्त १८ खात्यांनीच तशी तरतूद केली असून, ती सुद्धा आदिवासी लोकसंख्येच्या प्रमाणाच्या केवळ पाच टक्केच केली आहे. आर्थिक विश्लेषणातून समजून आले आहे की, वेगाने प्रगतीपथावर असणाऱ्या खात्यांनी आदिवासींच्या लाभांसाठी कोणतीही योजना तयार केलेली नाही.

ज्या राज्यांनी उपयोजनेसाठी त्या राज्यांतील आदिवासी लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा जास्त निधी वापरला त्यांना प्रोत्साहनपर निधी केंद्राकडून प्राप्त झाला. या राज्यात आंध्रप्रदेश, छत्तीसगड, झारखंड, केरळ, त्रिपुरा, ओडिशा, पश्चिम बंगाल इत्यादि राज्यांचा समावेश आहे. मात्र नामुष्कीची गोष्ट अशी की, महाराष्ट्राने आदिवासींच्या संख्येच्या प्रमाणाहून कमी खर्च उपयोजनांवर केला आहे. नियोजन आयोगानेच ही माहिती दिली आहे. समाज कल्याणाच्या किमान कर्तव्यापासून शासनाने अंग चोरुन घेण्याची आणि बाजाराभिमुख अर्थव्यवस्थेत हस्तक्षेप न करण्याची नर्लज्ज परिणती, आदिवासींच्या ऱ्हासास कारणीभूत होत आहे.

राज्यघटनेतील ७३वी दुरुस्ती केल्यावर १९९६ साली लोकसभेने आदिवासी क्षेत्रांसाठी एक खास कायदा लागू केला. पंचायत (अनुसूचित क्षेत्रांपर्यंत विस्तारित) कायदा, १९९६ [PESA] या कायद्याच्या सेक्शन ४ (डी) नुसार, आदिवासींसाठी असलेल्या पाचव्या अनुसूचित क्षेत्रांतील ग्रामसभा, त्यांच्या सरहद्दीच्या अखत्यारीतील सर्व संसाधनांचे व्यवस्थापन करण्यास सक्षम असून, हे व्यवस्थापन त्यांच्या परंपरागत रूढरीतीप्रमाणे करतील. याच कायद्याच्या कलम ४ (आय) नुसार, ग्रामसभेशी सल्लामसलत केल्याखेरीज आणि ग्रामसभेची अनुमती घेतल्याखेरीज त्यांची जमीन अगदी 'सार्वजनिक

हिता'साठी सुद्धा घेता येणार नाही. म्हणजे आदिवासीं कुटुंबांची वैयक्तिक किंवा गावाची सामुहिक उपभोगातील जमीन किंवा त्या परिसरातील नैसर्गिक संसाधनांचे स्त्रोत ग्रामसभेच्या संमतीशिवाय कोणालाही ताब्यात घेता येणार नाही. खाजगी व्यक्ती वा कंपन्या सोडाच अगदी शासनाला सुद्धा 'सार्वजनिक हिता'करिता देखील आदिवासींची जमीन कब्जात घेण्यास या कायद्याने असे निर्बंध घातले आहेत. तथापि जागतिकीकरणाच्या मगरमिठीने राज्यघटना आणि कायदे यांना धाब्यावर बसवून शासनाने आदिवासींचा उच्छेद सुरू ठेवला आहे.

**मागण्या:**

केंद्र आणि राज्य सरकारने संविधानातील आदिवासींसाठी असलेल्या तरतूदींचा काटेकोर अंमल केला पाहिजे. तसेच जे कायदे व योजना आदिवासींच्या व्यापक हितासाठी केले गेलेत त्यांची भक्कम अंमलबजावणी करायला हवी. पेसा आणि वनाधिकार कायद्यानुसार लहान पाड्यासह सर्व आदिवासी वस्त्यांना ग्रामसभा भरविण्याचा आणि निर्णय घेण्याचा अधिकार द्या. महाराष्ट्रातील सलग आदिवासी क्षेत्रांची राज्यघटनेच्या ६ व्या व ७ व्या अनुसूचींना अनुसरून प्रथम राज्य शासनाने आणि नंतर राष्ट्रपतींच्या आदेशानुसार केंद्र शासनाने महाराष्ट्र राज्यांतर्गत स्वायत्त प्रादेशिक/जिल्हा मंडळांची संरचना केलीच पाहिजे. राज्यघटनेतील मार्गदर्शक सूत्रांची आणि आदिवासींच्या हिताच्या कायद्यांची व योजनांची अंमलबजावणी न करणाऱ्या नोकरशहांची उचलबांगडी करा. केंद्र व राज्य शासनांनी अर्थसंकल्पीय एकूण आवाक्याच्या दहा टक्के आदिवासी उपयोजनांसाठी द्या आणि त्यांचा उपयोग करा. आदिवासी सल्लागार मंडळांना कार्यशील करा. अन्यथा कार्यक्षम असणाऱ्या आदिवासी आमदारांची सदस्य म्हणून नेमणूक करा.

## आदिवासी असल्याचे दाखले/सर्टिफिकेट्स

भारतीय संविधानाने आदिवासी अनुसूचित जमातींची वैशिष्ठ्ये लक्षात घेऊन त्या जमातींचा समावेश प्रथम राज्य शासनाने आणि नंतर केंद्र शासनाने राज्यघटनेत दुरुस्ती करून करावयाचा आहे. त्यासाठी एक प्रक्रिया पद्धती घालून दिलेली आहे. तथापि राज्यघटना १९५० मध्ये अंमलात आल्यानंतर भारतीय संघराज्यात अनेक बदल झाले आहेत. भाषावार प्रांतरचना आणि नंतरही अलग अलग प्रदेशांची निर्मिती केली गेली आहे. त्यामुळे आदिवासी जमातीचे दाखले एका प्रदेशात/राज्यात मिळतात तर त्याच जमातींना दुसऱ्या राज्यात अनुसूचित जमातीचे/आदिवासी नसून अनुसूचित जाती किंवा ओबीसी असल्याचे दाखले दिले जातात. दाखले देण्याची पद्धतही अतिशय जाचक आणि वेळकाढूपणाची आहे. त्याचप्रमाणे आदिवासी नसतांनाही बोगस दाखले मोठ्या प्रमाणात दिले गेले आहेत व जात आहेत. खरोखर आदिवासी असेल तरी दाखला मिळाला नाही म्हणून किंवा बोगस दाखला दिला गेला म्हणून अनेक प्रकरणे न्यायालयांत प्रलंबित आहेत. आदिवासी जमात म्हणून/अनुसूचित जमात किंवा जनजाती म्हणून समावेश करावा या मागण्यासाठी अनेक आंदोलने वरचेवर केली जात आहेत. महाराष्ट्रात बंजारा समुहाचा अनुसूचित जमातीत/स्केड्यूल ट्राईबमध्ये समावेश करावा म्हणून नांदेड जिल्ह्यात आपल्या कॉम्रेडसच्या पुढाकाराने आंदोलन केले गेले आहे. बंजारा समूह आंध्र प्रदेशमध्ये एस. टी. त गणला जातो. मराठवाडा हैद्राबाद संस्थान/आंध्र प्रदेशातून महाराष्ट्रात सामील होईपर्यंत या समूहाची गणना एस. टी. तच होत होती. पण त्यानंतर तो केंद्र सरकारच्या अखत्यारित ओबीसी मध्ये तर महाराष्ट्रात एन. टी. मध्ये धरला जात आहे. इतर सामाजिक समूह देखिल याबाबत काही ना काही मागण्या पुढे करीत आहेत. एवढेच नव्हे तर भांडवली पक्षांच्या पुढाऱ्यांनी समूहा-समूहात तेढ माजावी आणि संकुचित राजकारणाची पोळी भाजून

घेता यावी यासाठी सामील करा-करू नका असे नारे देऊन श्रमिकांत फूट पाडण्याचे उद्योग जारी ठेवले आहेत. अशा परिस्थितीत आपली भूमिका स्पष्ट असली पाहिजे. सामाजिक समूह आदिवासी आहे की नाही, त्याची गणना अनुसूचित जमातीत/स्केड्यूल्ड ट्राईब मध्ये करावी का एन. टी. मध्ये याबाबत योग्य ठरविले गेलेले निकष लावून निर्णय घ्यायला हवेत. यासाठी केंद्र व राज्य शासनाने काही एक आयोगाची योजना आखली पाहिजे. आपसात झगडे लागणार नाहीत आणि खरोखर न्याय मिळेल यासाठी आपण सल्ले दिले पाहिजेत व पाठिंबा द्यायचा की नाही ते ठरविले पाहिजे. दाखले देण्याच्या पद्धतीत देखिल पूर्ण पारदर्शकता आणि कालबद्धतेचे बंधन असायला हवे. नाशिक जिल्ह्यात कॉ. गावीत यांनी याबाबत सुचविलेली शिफारस अंमलात आणण्याचा आग्रह सगळीकडे धरायला हवा.

**मागण्या:**

केंद्र शासनाने आयोग नेमून समुहांनी केलेल्या मागण्या/दावे तपासून आणि राज्य सरकारांनी केलेले प्रस्ताव पाहून कालबद्ध रीतीने तक्रारींचे निवारण करून न्याय प्रस्थापित करावा. दाखले देण्यात पारदर्शकता आणि सच्चेपणा रहावा यासाठी दाखले ग्रामसभेत सर्वादेखत तपासणी करुन तिथल्या तिथे प्रत्येक महिन्यातील एका विशेष दिवशी देण्यात यावेत. खोटी सर्टिफिकीटे देणाऱ्या अधिकाऱ्यांना बडतर्फ करा व त्यांच्यावर खटले भरून कडक शासन करा. बोगस दाखले घेऊन लाभ उपटणाऱ्यांकडून लाभाची रक्कम वसूल करा. न्यायालयात पडून असलेली प्रकरणे लवकरात लवकर निकालात काढा. तपासणी करतांना सांस्कृतिक परंपरा, सामाजिक-आर्थिक निकष यांचा सुयोग्य उपयोग करा.

## समताप्रधान समुहसंस्कृतीचा विनाश

सगळ्याच आदिवासी समुहांची खास वैशिष्ठ्ये त्यांच्या ऐतिहासिक परंपरेशी, त्यांच्या असंख्य बोलीभाषेशी, एकजीवी सामुहिक जीवनशैलीशी, स्त्रि-पुरुष समतेच्या अंगभूत धारणेशी, परस्परांना सहकार्य करण्याच्या उत्कट भावनेशी बांधलेली होती. ही वैशिष्ठ्ये आदिवासी माणसांच्या निसर्गाशी असलेल्या जिव्हाळ्याच्या नात्यांनी घट्ट विणली होती. निसर्ग आणि माणसे यांचे नाते संघर्ष-सहकार्याच्या ताण्याबाण्यांनी गुंतलेले असते, हे खरेच. आदिवासींनी जगण्याच्या उर्मीतून निसर्गाचा उपयोग ज्या पद्धतीने केला ती पद्धती निसर्गाचे संवर्धन करणारी होती. निसर्गाला केवळ भोगवृत्तीने ओरबाडून नष्ट करणारी नव्हती. ही भोगवृत्ती नागरी संस्कृतीने आदिवासी क्षेत्रात पोचवली. आता जागतिक वित्त भांडवली संस्कृती अभूतपूर्व अशा वेगाने, निसर्गाला आणि आदिवासी माणसांना पूर्णपणे पोखरून काढत आहे.

आदिवासी जमातींची वांशिक (एथनिक), सांस्कृतिक आणि बोलीभाषांची बहुविधता जागतिक व्यापारीकरणाने घुसळून निघत आहे. आदिवासी त्यांची दुर्गम क्षेत्रे सोडून पोट भरण्याच्या अपेक्षेने देशातील अन्य भौगोलिक क्षेत्रांतील 'मुख्यप्रवाहा'त खेचले जात आहेत. त्यामुळे एका बाजूने त्यांच्या ऐतिहासिक सांस्कृतिक वैशिष्ठ्यांची 'ओळख' पुसली जात आहे. आणि दुसऱ्या बाजूने त्यांच्या बहुविधतेला अनेक प्रकारांनी धस लागत आहे. त्यांची, त्यांच्या स्वतःच्या पारंपरिक परिसराशी असलेली अभेद्य नाळ तोडली जात आहे. परिसरापासून जबरदस्तीमुळे विस्थापित होणे किंवा अनिच्छेने स्थलांतरित होणे म्हणजे सर्व श्रमिकांशी झालेले अभिसरण नव्हे. अतिदुर्गम दुर्धर परिस्थितीमधून स्वखुशीने बाहेर पडून विशाल समाजजीवनाशी समरस होणे नव्हे. परिसराशी असलेल्या अतूट सांस्कृतिक अनुभूतीचा, त्यांना स्वखुशीने नव्हे तर, जबरदस्तीने त्याग करावा लागत आहे. प्रगत होण्याच्या दुर्दम्य इच्छाशक्तीने, स्वतःभोवतीची सनातन कुंपणे तोडून, नवनवीन प्रांत पादाक्रांत करण्याच्या अंतःस्फूर्त आकांक्षाचा परिपोष

म्हणून हे घडत नसून, संवेदनहीन दुष्ट शोषकांनी जीवन जगणे असह्य केल्याचा, तो बाहेरून लादलेला जुलूम आहे. हा आदिवासींच्या अस्तित्वावरचा निर्घृण हल्ला आहे. पशुपातळीवरील अन्न-पाण्याच्या गरजा भागवणारे अस्तित्वच जर पणाला लागले असेल तर सांस्कृतिक वैशिष्ठ्यांची आणि बहुविधतेची जपणूक करण्याची जाणीव जीवंत कशी राहील? त्यामुळे आदिवासींच्या संस्कृतीचे बेगडी बाजारु प्रदर्शन, तिचे जतन केले जात असल्याचा दिखाऊपणा, प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी हमखास केला जातो. आदिवासींचे सामुहिक नृत्य-संगीत, सामुहिक जीवनव्यवहाराच्या परिप्रेक्षात साठवलेले असते. जुने सामुहिक जीवन अस्तंगत होत असतांना, जर नव्या सामुहिक सहजीवनाचा आनंदी पर्याय निर्माण केला नाही, तर आदिवासी समुहांचे समूळ उच्चाटन होणे क्रमप्राप्त ठरते.

आजचा जागतिकीकरणाचा उफराटा प्रवास, सर्वसमावेशक सांस्कृतिक विकासाला फाटा देऊन, ब्राह्मणी वर्चस्ववादी जुनाट मूल्ये आणि पाश्चात्य वर्चस्ववादी मूल्ये यांच्या कचाट्यात व्यक्तीवादी-चंगळवादी जीवनदृष्टी, स्त्रियांना हीन लेखणारी पितृसत्ताक वृत्ती, हुंडा पद्धती यांचा अंगिकार, आदिवासी समुहातून वर चढत गेलेल्या काही मातब्बर व्यक्तींनी केला आहे. मात्र डाकीणप्रथा, जुनाट अंधश्रद्धा आणि अलिकडच्या काळात घरंगळत गेलेली व्यसनाधीनता यांचा वैज्ञानिकदृष्टीकोनाने प्रतिवाद करण्याचे भान व धैर्य फारच थोड्या सुशिक्षित आदिवासींनी दाखविले आहे. हिंदू जातीव्यवस्थेच्या परीघात लपेटून जाण्यापासून बचावलेले आदिवासी समूह, जाती-जातीत वाटून, जाती-उतरंडीच्या तळात गाडण्याकरिता प्रयास करणाऱ्या धर्मांध शक्तींचा जोरकसपणे होत असलेला शिरकाव, अत्याधुनिक नवउदारवादी प्रवक्त्यांनी उचलून धरला आहे. त्याला विरोध करणाऱ्या आदिवासी संघटनांची शक्ती क्षीण आहे. वैश्विकरणाच्या काळात आधुनिकतेशी वावडे असलेल्या सनातनप्रेमी धर्मवाद्यांनी आदिवासींच्या सांस्कृतिकविश्वाचा पद्धतशीरपणे ताबा घेतला आहे. डॉ. नरेंद्र दाभोळकरांचा खून हे त्याचे बदनाम उदाहरण आहे. ख्रिश्चन मिशनऱ्यांचे वर्चस्व याला अपवाद नाही, हेही नीट लक्षात ठेवायला हवे. आदिवासींच्या 'अस्मिते'चे एकांगी राजकारण करणाऱ्या बहाद्दरांनी देशातील सर्वव्यापी जनवादी चळवळीपासून त्यांना दूर ठेवण्याचा प्रयत्न कसोशीने चालविला आहे. तलासरीच्या या सम्मेलनाने या सांस्कृतिक घडामोडींचा परामर्श घेऊन उचित सूचना करायला हव्यात.

## नजिकच्या काळातील अग्रहक्काची कार्ये

१. आदिवासी अधिकार राष्ट्रीय मंचच्या बॅनरखाली तालुका आणि जिल्हा पातळीवरील सम्मेलने आयोजत करणे.
२. आपापल्या तालुक्यातील व जिल्ह्यातील ठोस परिस्थितीचा अभ्यास करणे. आदिवासी जनतेमधील विविध घटकांच्या समस्या नीट समजावून घेण्यासाठी शास्त्रीय पद्धतीने पाहणी/सर्व्हे करणे. त्यावर आधारित मागण्यांची सनद तयार करून किमान दिलासे मिळविण्याकरिता सातत्यपूर्ण रीतीने आणि स्थानिक प्रश्न धसास लावेपर्यंत पूर्वतयारीनिशी लढे संघटित करणे. हे लढे करतांना शासकीय धोरणांशी संबंधित परिणामकारक हस्तक्षेपासाठी करावयाची आंदोलने जोडून घेणे.
३. केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांच्या अंमलबजावणीसाठी विशेष मुद्दे घेऊन न्याय मिळविणे. भ्रष्टाचाराच्या ठोस घटना उजेडात आणून त्याविरुद्ध संघर्ष करणे. नवीन लोकपाल कायद्याचा उपयोग करून आदिवासींची होणारी लूट थांबविण्याचा प्रयत्न करणे.

४. कामगार संघटना/ट्रेड युनियन्स, शेतकरी व शेतमजुर संघटना, विद्यार्थी-युवक-महिला संघटना यांच्याशी जवळीक साधत आदिवासींच्या समस्यांवर संयुक्त लढ्यात भागिदारी करणे.
५. आदिवासी-बिगर आदिवासी सर्व श्रमिकांची व्यापक जनवादी चळवळ बळकट करण्याकरिता खास लक्ष देणे. खोट्या आणि भ्रामक अस्मितेच्या एनजीओ टाईप राजकारणापासून आदिवासींच्या चळवळीला वाचवणे.
६. धर्मांध आणि हिंसक शक्तींविरुद्धची लढाई चालूच ठेवणे. आदिवासींना हिंदू जातीव्यवस्थेत बांधणाऱ्या कटकारस्थान उधळून लावणे.
७. कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉँग्रेस आणि भाजपच्या भांडवलदारी शासनांच्या नवउदारवादी धोरणांना कडवा विरोध करणे.
८. प्रागतिक, जनवादी, डाव्या राजकारणाला पुढे नेण्यासाठी युवक-युवतींची राजकीय-वैचारिक जाणीव विकसित करणे. त्याकरिता अभ्यास शिबीरांचे आणि कार्यशाळांचे आयोजन करणे.

**!आदिवासी अधिकार राष्ट्रीय मंच जिंदाबाद!**

**!आदिवासी-बिगर आदिवासी श्रमिक एकता जिंदाबाद!**

**!महाराष्ट्र तलासरी आदिवासी सम्मेलन जिंदाबाद!**